# दहावीत मुलींची बाजी, विद्यालयांनीही जपली यशाची परंपरा

लातूर : इयत्ता १२ वी पाठोपाठ १० वीचाही निकाल लागला आहे. शिक्षण क्षेत्रात लातूरचा वेगळा असा दबदबा आहे. त्यामुळे या दोन्ही निकालांवर राज्यभरातील विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे लक्ष असते. राज्यात लातूर विभाग आठव्या स्थानावर असला तरी लातूर जिल्ह्याने आपला दबदबा कायम ठेवला आहे. दहावीच्या परीक्षेत यंदाही मुलींनीच बाजी मारली असून जिल्ह्याचा निकाल ९२.८० टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांच्या अथक परीश्रमाला माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. अनेक विद्यालयांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. निकाल जाहीर होताच विद्यार्थी पालकांमध्ये वेगळाच आनंद होता तर १०० टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार करण्यात आला.

## श्री श्री रविशंकर विद्यालयाचा १०० टक्के निकाल





**लातूर :** येथील गोपाळ नगरमधील श्री श्री रविशंकर माध्यमिक विद्यालयाने दहावीच्या परीक्षेत यंदाही १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. सौम्या सचिन बडवे हिने ९९. ८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक, मधुरा विजयकुमार शिनगारे हिने ९९.४० टक्के गुणांसह द्वितीय तर सिद्धी चंदन कुलकर्णी हिने ९८.०० टक्के गुण घेत तृतीय क्रमांक मिळविला. परीक्षेत एकूण १०१ विद्यार्थ्यांपैकी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ५२ विद्यार्थी ठरले. तसेच ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ३३ विद्यार्थी, ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे १४ विद्यार्थी आणि ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे २ विद्यार्थी यशस्वी झाले. या यशाबद्दल संस्थेचे संचालक राजेंद्र कोळगे, कार्यालयीन व्यवस्थापक आशिष कोळगे, मुख्याध्यापिका सोनाली कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सुलभा जोशी तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## 'स्वामी विवेकानंद'चा १०० टक्के निकाल



**लातूर :** जेएसपीएम लातूर द्वारा संचालित स्वामी विवेकानंद विद्यालयाने दहावी बोर्ड परीक्षेत यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली. विद्यालयाच्या या नेत्रदीपक निकालामुळे लातूर पॅटर्नच्या वैभवात आणखी भर पडली असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्येही भर पडलेली आहे. सिद्धी बालाजी मेंगले हिने ९८.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. सुमित डोणे याने ९८.२० टक्के घेऊन द्वितीय तर गौरी शेळके हिने ९७.८० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला आहे. ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे १६ विद्यार्थी, ९० टक्केंपेक्षा अधिक गुण घेणारे ९ विद्यार्थी, ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे ६१ विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार .शिवाजी पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रणजीत पाटील कव्हेकर, संचालिका अदिती पाटील कव्हेकर, बापूसाहेब गोरे, विनोद जाधव, अनिरुद्ध पाटील, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, गणेश कदम, बाळाराम पिचारे, अलका अंकुशे, राधा कवरे, विनोद सूर्यवंशी, व्यंकट कांबळे, रमाकांत शिंदे, अफसर शेख यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## परिमल विद्यालयाचा सर्वोत्तम निकाल

**लातूर :** शहरातील नारायण नगर भागातील परिमल





माध्यमिक विद्यालयाचा एस. एस. सी. बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला असून त्यापैकी १०० टक्के गुण घेऊन ६ विद्यार्थीनी यशाची परंपरा कायम राखली आहे. तन्मया दातीर, विक्रांत सावंत, मधुरा चिटणीस, वैष्णवी निकम, श्रीयश भुजबळ, ईश्वरी सोनवणे यांनी १०० टक्के गुण घेऊन विद्यालयाचे वेगळेपण दाखवून दिले आहे. तसेच वेदांत वाघचौरे, अनुष्का हांडे, श्रेया भगोले, अदित्य बिराजदार, अनुक्रमे ९९.४० टक्के गुण घेऊन घवघवीत यश मिळवले आहे. ९५ टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे ४९ विद्यार्थी असून ९० टक्के पेक्षा अधिक गुण घेणारे १०५ विद्यार्थी आहेत. २२३ विद्यार्थीनी विशेष प्राविण्यात येण्याचा मान मिळविला आहे.संस्थेचे संस्थापक तथा सचिव प्राचार्य बाबुराव जाधव, प्राचार्य श्रीनिवास जाधव पाटील, पर्यवेक्षक शेळके, कदम, मुख्यध्यापिका पवार, शिक्षक भांगे, मुळे, गायकवाड, जारे, भालेकर, पाटील, शेलमोहेकर, कंधारे, बिराजदार, नारगुंडे, राठोड, जाधव, योगिता, मुळजे, गजरे, गुडापे, सूर्यवंशी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## शारदा इंग्लिश स्कूलचा १०० टक्के निकाल





**लातूर :** येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलने यंदाही निकालाची गौरवशाली परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे.शाळेच्या गुणवत्ता यादीत वसुंधरा प्रशांत दहिफळे हिने ९७.४० टक्के गुण घेत प्रथम क्रमांक, यश बाबुराव घाडगे याने ९३.४० टक्के गुणांसह द्वितीय तर राधिका तानाजी मुंडे हिने ९२.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच आदित्य संजय पवार याने ९२ टक्के, श्रीकर ओमनाथ भंडारे याने ९० टक्के गुण मिळवले. या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम.आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील तसेच प्राचार्य प्रा. एल. टी. पुरी, मानसी पाटील, शिक्षक वैजनाथ जाधव, दर्शना बोराडे, उषा गुडदे, मीरा जाधव, मीनाक्षी सूर्यवंशी, तुकाराम सूर्यवंशी, रोहिणी कदम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## 'केशवराज' चे घवघवीत यश



**लातूर :** दहावी बोर्ड परीक्षेत श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९९.७२ टक्के लागला आहे. विद्यालयातील २२० विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. यातील ९ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण प्राप्त केले आहेत. विशेष प्राविण्यता मिळवणारे एकूण ५१४ विद्यार्थी आहेत. १०० टक्के गुण घेणारे विद्यार्थी स्वराज शिंदे, साईनाथ सुरवसे, श्रावणी चव्हाण, शिवम चाटे, वेदांत शेळगे, पृथा इटोलीकर, सार्थक मुचुटे, आदित्य गरड व अथर्व लोंढे हे आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सदस्य नरेंद्र पाठक, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, दहावी प्रमुख अर्चना ठोंबरे, सहप्रमुख लक्ष्मण गिराम तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले.

## जनकल्याण निवासी विद्यालयाचा १०० टक्के निकाल



**लातूर :** तालुक्यातील हरंगुळ (बु.) येथील जनकल्याण निवासी विद्यालयाने दहावीच्या निकालात यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील ३३ विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण तर ५२ विद्यार्थ्यांनी ७५ ते ९० टक्क्यांदरम्यान गुण संपादन केले आहेत. या परीक्षेसाठी विद्यालयातील ९४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ८५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील दीपक ठोंबरे ९९.६० टक्के गुण मिळवून प्रथम, नेहा घाडगे हिने ९७ टक्के गुण मिळवून द्वितीय तर प्रथमेश गड्डीमे व आर्यन दिवाणे यांनी ९५.८० टक्के गुण मिळवून संयुक्तरीत्या तृतीय क्रमांक पटकाविला. यशाबद्दल दहावीच्या प्रमुख माधुरी अंतरकर, दाक्षयणी भालेकर, गुणवंत राठोड, आनंद वळसनकर व संगीता भदाडे यांचे प्रकल्प अध्यक्ष प्रकाश लातूरे, उपाध्यक्षा डॉ. लिलाताई कर्वा, राजेश सुगरे, उमेश सेलूकर, सतीश कुलकर्णी, प्रशांत मेतकुटे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर सोनटक्के, अधीक्षक दत्ता माने व सहअधीक्षक बाबासाहेब मते यांनी कौतुक केले.

## श्री देशीकेंद्र विद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांना १०० टक्के मार्क

**लातूर :** दहावी बोर्ड निकालात महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारा संचलित श्री देशिकेंद्र विद्यालयाने आपले वर्चस्व कायम राखत यश संपादन केले आहे. शाळेचा एकूण निकाल ९९.७२ टक्के लागला असून तब्बल १५ विद्यार्थ्यांनी १०० टक्के गुण मिळवून नवा इतिहास रचला आहे. १०० टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांत राजवर्धन इंगळे, स्वरा शिंदे, श्रेया अंतुरे, समर्थ कुरूम, वैष्णवी मुडबे, रितेश मोटे, अदिती चव्हाण, स्वप्निल येरमे, अनुष्का कुसंगे, ज्ञानेश्वरी माने, कृष्णा शिंदे, विवेक शिंदे, मृगा आनेराव, गौरी आनेराव, आश्लेषा बिरादार यांचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनिल मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक बसवराज येरटे व सर्व संचालक, मुख्याध्यापक शिवाजी कोळी, उपमुख्याध्यापक शिवानंद स्वामी तसेच सर्व पर्यवेक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## श्री माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा

येथील श्री माध्यमिक विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून यंदाही यशाची परंपरा विद्यालयाने कायम राखलेली आहे. विजय विकास माने ८९.६० टक्के घेऊन प्रथम आला असून द्वितीय गजानन सतीश लाकाळ (८९.४०%) तृतीय अर्जुन भागवत गारोळे व श्रेयस बाबासाहेब चव्हाण (८८.४० टक्के) हे विद्यार्थी आले आहेत. विद्यालयातील एकूण ७४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. विशेष प्राविण्यासह ३६, प्रथम श्रेणीत २९ व द्वितीय श्रेणीमध्ये ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्थेचे अध्यक्षा सरस्वती शिंदे, सचिव डॉ. दिलीप गुंजरगे, उपाध्यक्षा व मुख्याध्यापिका मनीषा शिंदे -गुंजरगे, मुख्याध्यापक घाटके वैजनाथ, प्राचार्य मनोज कुलकर्णी व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

## विद्याविकास माध्यमिक विद्यालय, लातूर

**लातूर :** येथील श्रीनगरमधील विद्याविकास विद्यालयाचा निकाल ९८.९८ टक्के लागला आहे. कृष्णा पांडूरंग मुंडे व गाढवे पार्थ सुरेश हे दोन विद्यार्थी ९८.६० टक्के गूण घेऊन विद्यालयात प्रथम आले आहेत. तसेच मोरे अनुष्का अविनाश ही विद्यार्थिनी ९८ टक्के गुण घेऊन द्वितीय, कुरसुळे संकेत भिमाशंकर ९७.४० टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. परीक्षेस एकूण २९५ विद्यार्थी बसले होते यापैकी २९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. पैकी विशेष प्राविण्यात १५४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ८९, द्वितीय श्रेणीत ३८ व तृतीय श्रेणीत ११ उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नागरे एस. ए., सचिव चोले बी. जी., उपाध्यक्षा भताने एम. एम., कोषाध्यक्ष वंजारे जी. के. सर्व संचालक मंडळ, मुख्यध्यापक कातपूरे जे. एम. व विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## स्वराली देशमुख हिचे दहावी परीक्षेत यश



**लातूर :** येथील श्री किशन सोमाणी विद्यालयातील स्वराली दिलीप देशमुख हिने १० वी बोर्ड परीक्षेत ९५.२० टक्के गुण मिळवले आहेत. तिच्या यशाबद्दल सर्वस्तरातून कौतुक होत आहे. वृत्तपत्र विक्रेते लालासाहेब दगडू शिंदे यांची नात व सचिन लालासाहेब शिंदे यांची भाची आहे.

## ज्ञानेश्वर विद्यालयाचा ९७.५९ टक्के निकाल



**लातूर :** १० वी बोर्ड परीक्षेत येथील शाहू चौकातील ज्ञानेश्वर विद्यालयाचा निकाल ९७.५९ टक्के लागला असून विद्यालयाने घवघवीत यशाची परंपरा कायम राखली आहे.

आदर्श युवराज कांबळे १०० टक्के, स्नेहा चक्रधर कारभारी १०० टक्के घेऊन प्रथम तर वैष्णवी सुधाकर पानढवळे ९९.६० टक्के घेऊन द्वितीय तर सृष्टी चव्हाण हिने ९९ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यालयातील ४२ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, उपाध्यक्ष प्रल्हाद दुडीले, सचिव डी.एन. शेळके, कोषाध्यक्ष विनायक पिनाटे, सहसचिव विठ्ठल इगे, संचालक, प्रा. प्रकाश शिंगडे, नाथराव कोल्हे, माधव गोलावार, अनिरूध्द शेळके, हरिश्चंद्र येरमे, डॉ. सोपान जटाळ, चंदुलाल बलदवा, प्राचार्य संजय मलवाडे, उपप्राचार्य माधव क्षीरसागर, पर्यवेक्षक हणमंत बैनगिरे, पुनम पाटील, संजय कासले, सुधाकर बुरगे, मुख्यलिपीक अजय आरदवाड व सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

## मुक्तेश्वर विद्यालयाचे यश





**लातूर :** येथील मुक्तेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयाने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. मुक्तेश्वर माध्यमिक विद्यालयाचा ९९ टक्के निकाल लागला आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेसह यश मिळविले.

कंकाळ श्रीकांत ज्ञानेश्वर याने ९६.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सुरसे आर्यन बाबुराव ९२.८० टक्के गुणांसह द्वितीय तर सय्यद मोहम्मद अकबर जावेद यांनी ८९.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. विद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून ३० विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. संस्थेचे सचिव रामराज पवार, संस्थेच्या संचालिका अनुसया पवार, उपाध्यक्षा कल्पना भाडसंगे, शालेय समितीच्या अध्यक्षा प्रतिभाताई विराचार तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका खवळकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## वाले इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के







**लातूर :** येथील वाले इंग्लिश स्कुलचा एस. एस. सी. बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकाल लागला. या परिक्षेसाठी वाले इंग्लिश स्कुलचे ८६ विद्यार्था बसले होते. पैकी सर्वच्या सर्व उत्तीर्ण झाले. ३१ विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. सिद्धिराज देशमुख १०० टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे. काळे कादंबरी किरण ९९.८० टक्के गुणांसह द्वितीय तर शेख माझ ९९.६० टक्के गुण घेत तृतीय आला, देशमुख वेदांतिका ९८.६० टक्के गुणांसह चौथी तर निटूरे हिमांशू ९८ टक्के गुण घेत पाचव्या स्थानी आहे. ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीण झाले आहेत.

संस्थेचे सचिव मकरंद सावे, कोषाध्यक्ष शांतीकुमार कुचेरिया, सदस्य शिवशंकर बिडवे, झकीखान कायमखानी, संदीप सावे, ममता सावे, प्राचार्य भोगडे, उपप्राचार्य बाकलीकर, पयवेक्षिका धाराशिवकर व सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## संत नामदेव माध्यमिक विद्यालय, लातूर

**लातूर :** येथील अंबाजोगाई रोडवरील संत नामदेव माध्यमिक विद्यालयाने यंदाही यशाची परंपरा कायम ठेवत दहावी परीक्षेत विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. ओमकार राठोड या विद्यार्थ्याने १०० टक्के गुण घेतले असून ९२ टक्क्यांपेक्षा जास्त गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ६६ आहे. संस्थेचे सचिव शिवाजी परगे, अध्यक्ष अगस्त्य परगे, कोषाध्यक्षा अनिता कलमे, उपाध्यक्षा अमृता परगे, प्राचार्या भाग्यश्री बोंबडे, मुख्याध्यापक राम बोंबडे व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## श्री केदारनाथ विद्यालयाचे यश

**लातूर :** येथील श्री केदारनाथ विद्यालयातील शुभंम जोगदंड या विद्यार्थ्याने ८९ टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. शशिकांत गंभिरे ८८.२०, मुशरफ शेख ८७.४० टक्के, पुनम चव्हाण ८६.४० टक्के, प्रथमेश सुरवसे ८५.८० टक्के, संस्कार घोलप ८४.२० टक्के, आयान पठाण ८२ टक्के, अजिंक्य दनदने ८१.८०, गणेश शेळके ८०.८० टक्के गुण मिळवले आहेत. यशबद्दल संस्थेचे सचिव शिवाजी परगे, अध्यक्ष अगस्त्य परगे, कोषाध्यक्षा अनिता कलमे, उपाध्यक्षा अमृता परगे, प्राचार्या भाग्यश्री बोंबडे, मुख्याध्यापक राम बोंबडे व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


**महाराष्ट्र ग्रामीण बँक**
**MAHARASHTRA GRAMIN BANK**
शासकीय मालकीची शेड्यूल्ड बँक Scheduled Bank Owned by Government

**ई-लिलाव व विक्री सूचना**

मुख्य कार्यालय : प्लॉट नं. ४२, गट क्र. ३३ (भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर- IV,सिडको, छ. संभाजीनगर - ४३१ १३६

क्षेत्रीय कार्यालय : लातूर

**सेक्युरीटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल असेटस अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तहत ई – ऑक्शन द्वारे (ऑनलईन विक्री)विक्रीची जाहीर सूचना तथा कर्जदार / जामीनदारास सूचना सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ (यापुढे नियम असे संबोधन्यात येईल) सह वाचण्यात येणारा सरफेसी कायदा २००२ ( यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल) तहत ई – ऑक्शन द्वारे विक्री.**

खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा सेक्युरीटायजेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल अॅसेटस अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तहत प्रदान अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी आणि खालील कर्जदार / तारणकर्ता यांचे संरक्षित मालमत्तेच्या घेतलेल्या ताब्याला अनुसरून, सर्व जनतेस व संबधीत कर्जदार / तारणकर्ता व जर त्यांचे कायदेशीर वारसदार असतील तर त्यांचेसह सर्व संबधीतास कळविण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे, बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त कायद्याचे नियम ८ व ९ नुसार खालील मालमत्ता **'जशी आहे जेथे आहे तशी' व 'जी काय आहे तशी'** या तत्वावर ऑनलाईन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक हे संरक्षित ऋणको आहेत, त्यामुळे कर्जदाराचे /भागीदाराचे इतर कोणत्याही ऋणकोचे प्रलंबित वाद हे लिलावाद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीमध्ये तसेच खरेदीदाराचे हक्क यास प्रभावित करू शकणार नाहीत. तसेच विक्री करण्यात येणा–या मालमत्तेवर कोणत्याही कोर्टाची स्थगिती (Stay) नाही.

| मिळकत प्लॉट क्र. | कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव व पत्ता, शाखेचे नाव व कर्जखाते क्र. | मालमत्तेचा तपशील | विक्री केली जात असलेल्या मालमत्तेची थकीत रक्कम | आरक्षित किंमत रु. / इसार जमा राशी रु. / बोली रक्कमेतील किमान वाढ रु. | प्रत्यक्ष ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार : **श्री.अजय बब्रुवान माकणे प्रोप.अजय हॉटेल आणि रेस्टोरंट** मु. पोस्ट. औराद शाहजणी ता. निलंगा जि. लातूर **जमिनदार – १.श्री.गोरख पांडुरंग नवडे २.श्री.फुलचंद माधवराव बोंडगे** मु. पोस्ट. औराद शाहजणी ता. निलंगा जि. लातूर **शाखा-औराद शाहजणी कर्ज खाते क्र.:८००३२४४६८०४** | १.श्री.अजय बब्रुवान माकणे यांच्या नावे असलेली मौजे मार्केट यार्ड रस्ता, औराद शाहजणी ता. निलंगा जि. लातूर येथील गहाणखत असलेली मालमत्ता ग्रा. पं. क्रं. ३५३३ प्लॉट क्रं. ३१ सर्वे क्रं. ८४/A ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट **ज्याची चतु:सीमा खलील प्रमाणे आहे – पुर्व:** रस्ता, **पश्चिम:** प्लॉट क्रं. ७ आणि ८ **उत्तर:** प्लॉट क्रं. ३३, **दक्षिण:** प्लॉट क्रं. ३० २. श्री. अजय बब्रुवान माकणे यांच्या नावे असलेली मौजे मार्केट यार्ड रस्ता, औराद शाहजणी ता. निलंगा जि. लातूर येथील गहाणखत असलेली मालमत्ता ग्रा. पं. क्रं. ३५३४ प्लॉट क्रं. ३२ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १२०० चौ. फुट ज्याची चतु:सीमा खलील प्रमाणे आहे – **पुर्व:** रस्ता, **पश्चिम:** प्लॉट क्रं. ७ आणि ८ **उत्तर:** प्लॉट क्रं. ३३, दक्षिण: प्लॉट क्रं. ३० **बँक प्रॉपर्टी आयडी : MAHGLAT80032446804** | **दि. १०.११.२०२२ वरील रु. ५३९८६०.०० आणि दिनांक १०.११.२०२२ पासुनचे प्रलंबित व्याज व ईतर खर्च** | रु. १२,३०,००० /- / रु. १,२३,००० /- / रु. १०,०००/- | १५.०३.२०२५ |

**मालमत्ता निरीक्षणाचा दिनांक व वेळ: २२/०५/२०२६ ; सायंकाळी ५:०० पर्यंत**

**केवायसी व अनामत रक्कम जमा करण्याचा दिनांक व वेळ : २५/०५/२०२५; सायंकाळी ५:०० पर्यंत**

**लिलावाचा दिनांक व वेळ (५ मिनिटांच्या वाढीव वेळेनुसार, जर शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावली असेल तर) : २६/०५/२०२६; सकाळी ११:०० ते दुपारी १:३० पर्यंत**

**अटी व शर्ती–** १) लिलाव ऑनलाइन पद्धतीने https://baanknet.com या संकेतस्थळावर निश्चित केलेल्या दिवशी होईल. शेवटच्या ५ मिनिटांत बोली आल्यास लिलाव आपोआप ५ मिनिटांनी वाढवला जाईल.
२) बोलीदारांनी https://baanknet.com या वेबसाईटवर नोंदणी करावी लागेल आणि अनामत रक्कम (Earnest Money Deposit) लिलावा आधी भरावी लागेल. ही रक्कम बँकेकडे जमा होऊन वेबसाईटवर अपडेट होईपर्यंत थोडा वेळ लागू शकतो. म्हणून लिलावाच्या कमीत कमी 24 तास आधी अनामत रक्कम भरावी.
३) सविस्तर अटी व शर्तींसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वेबसाईटवर व **https://baanknet.com** या वेबसाईटवर दिलेल्या लिंक्स बघाव्यात. तसेच पुढील अधिकार्यांशी संपर्क साधावा: **१) श्री. यशवंत कृ. वानखेडे, अधिकृत अधिकारी/ क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, लातूर. मोबाइल क्रं. ७५८८४२३४३८, ईमेल: rmlatur@mahagramin.co.in २) श्री. भारतभूषण महादेव रामटेके, शाखा व्यवस्थापक, औराद शाहजणी, मोबाईल: ९७३०८६३०३३ ३) श्री. अभय वावळे, कायदा अधिकारी, मोबाइल क्रं. ७०३०६१६८०९ ४) श्री. उदय जाधव, मोबाइल क्रं. ९८२०८७८२५५ ईमेल: uday.jadhav@psballiance.com ५) हेल्पलाइन क्रं. ८२९१२२०२२० आणि ईमेल: support.baanknet@psballiance.com.**
४) यशस्वी बोलीदारास खरेदी रक्कमेपैकी २५% (अनामत रक्कम सहित) रक्कम लगेच जमा करावी लागेल आणि उरलेली रक्कम १५ दिवसांच्याआत भरावी लागेल.
५) बोली आरक्षित किमतीपेक्षा जास्त असावी आणि पुढील बोली किमान ₹ १०,००० च्या पटीत वाढवावी लागेल.
६) ज्या बोलीदारांची बोली यशस्वी ठरलेली नाही, अशा बोलीदारांचा अनामत ठेव रक्कम लिलाव प्रक्रिया संपल्या नंतर परत केली जाईल.
७) लिलाव बँकेच्या मंजुरीवर अवलंबून आहे. कर्जदाराने बँकेकडे पूर्ण थकबाकी भरल्यास लिलाव रद्द केला जाऊ शकतो.
८) मालमत्ता **जशी आहे तशी आणि जे आहे ते** या तत्वावर विकली आहे. बोलीदारांनी मालमत्तेबाबत स्वत: चौकशी करावी, त्यावरील कोणतेही दावा/ खर्च बँकेशिवाय असतील तर त्यास बँक जबाबदार नाही.
९) बँकेला कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. ती लिलाव रद्द/स्थगित/परिवर्तीत करू शकते.
१०) खरेदीदाराने सर्व शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, कर आणि ईतर खर्च स्वत: भरावेत. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावावरच दिले जाईल.
११) मालमत्तेची पाहणी इच्छुकांनी स्वतःच्या खर्चाने करु शकतात, पण यासाठी वरील संपर्क व्यक्तींशी पूर्व नियोजित वेळ घेऊन भेट द्यावी.
१२) लिलाव सरफेसी कायदा २००२ अंतर्गत होणार आहे, व वरील अटींचे पालन बंधनकारक आहे.

दिनांक : ०९/०५/२०२६
ठिकाण : लातूर

(स्वैर भाषांतर, तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.)

**प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय, लातूर**